# सापळा केस

दिनांक १४/०२/२०१९

**जानकीराम कल्याण चिमणगुंडे, अव्वल कारकून, तहसिल कार्यालय पाथरी, ता.पाथरी,.जि. परभणी यांनी ८,००/– रू. लाचेची रक्कम स्विकारले असता त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले.**

यातील तक्रारदार यांनी दिनांक १४/०२/२०१९ रोजी अेसीबी कार्यालय परभणी येथे तक्रार दिली की, त्यांचे राशनकार्ड (शिधापत्रीका) तयार करून देण्यासाठी लोकसेवक जानकीराम कल्याण चिमणगुंडे, अव्वल कारकून, तहसिल कार्यालय पाथरी, ता. पाथरी, जि. परभणी हे १,०००/–रूपये लाचेची मागणी करीत आहेत, त्यांचेवर योग्य ती कार्यवाही करावी. वगैरे मजकुराची तक्रार दिली.

त्यांचे तक्रारीवरून, ब्युरो कडुन क़रण्यात आलेल्या कार्यवाहीत दिनांक १४/०२/२०१९ रोजी लोकसेवक लोकसेवक जानकीराम कल्याण चिमणगुंडे, अव्वल कारकून तहसिल कार्यालय पाथरी यांनी तक्रारदार यांना त्यांचे सदर कामासाठी तडजोडीअंती ८००/– रू. लाचेची मागणी करून तहसिल कार्यालय पाथरी येथे ८००/–रूपये लाचेची रक्कम पंचासमक्ष स्विकारली असता त्यांना लाचेच्या रक्कमेसह पकडण्यात आले. लाचेची रक्कम त्यांचे ताब्यातुन हस्तगत करण्यात आली आहे. त्यांचे विरूध्द पो.स्टे.पाथरी येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

सदरची कार्यवाही मा.पोलीस अधीक्षक श्री.संजय लाटकर, नांदेड परिक्षेत्र नांदेड, अपर पोलीस अधीक्षक, श्री नुरमहंमद शेख यांचे मार्गदर्शनाखाली, श्री गजानन विखे पोलीस उप अधीक्षक, पोलीस निरीक्षक श्री.अनिल गव्हाणकर, पोह/लक्ष्मण मुरकूटे, जमील जागीरदार, मिलींद हनुमंते, पोना/सचिन गुरसुडकर, शेख मुखीद, पोशि/सचिन धबडगे, माणिक चट्टे, चालक भालचंद्र बोके, नितीन काळे आणि अे.सी.बी.परभणी यांनी यशस्वी केलेली आहे.

परभणी जिल्हयातील नागरीकांनी भ्रष्टाचाराविरूध्द तक्रार देण्यासाठी अथवा भ्रष्टाचारा विरूध्द करण्यात येणा–या कारवाई बाबत अधिक माहीतीसाठी खालील दिलेल्या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन अपर पोलीस अधीक्षक श्री नुरमहंमद शेख, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग परभणी यांनी केले आहे.

**दुरध्वनी क्रमांक ०२४५२–२२०५९७**
**टोल फ्री क्रमांक १०६४**

श्री.संजय लाटकर पोलीस अधीक्षक ला.प्र.वि.नांदेड,परिक्षेत्र नांदेड :– ०२४६२–२५५८११
श्री नुरमहंमद शेख, अपर पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि.परभणी – ९८२३३९०३३३
श्री गजानन विखे, पोलीस उपअधीक्षक, ला.प्र.वि.परभणी– ९९२२५४७८९८
श्री.अनिल गव्हाणकर, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि.परभणी – ९८२३६१६१४५
श्री.विवेकानंद भारती, पोलीस निरीक्षक,ला.प्र.वि.परभणी – ९४२३४२९७८६

(अनिल गव्हाणकर)
पोलीस निरीक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो परभणी

Scanned by CamScanner